निशाणी ४१

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ४ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – शाम अशोक शेटे, वय – ३३ वर्षे,
व्यवसाय – जिम ट्रेनर, राहणार – कारखाना रोड, अकोले,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –</u>**

१. घटना दि. ०९.०७.२०१७ रोजी रात्री १२:०० वाजता अकोले येथील बाजारतळासमोर घडली होती. त्यादिवशी मी, माझा मित्र शाहरूख शेख व अमोल गायकवाड असे जेवन करून येत असताना बाजारतळासमोर राऊंडची पोलीस गाडी उभी होती. आम्ही गाडी कडेला लावून त्यांचेसोबत बोलत असताना समोरून व्हाईट कलरची झेन गाडी राजूरकडून येत होती. सदरची गाडी ही भरधाव वेगाने आली. समोरून अचानक आमच्या दिशेला येवून जोराची धडक दिली. मी व माझा मित्र शाहरूख शेख बाजूला पडलो. अमोल गायकवाड यांना जोराची धडक बसून ते बेशुध्द अवस्थेत असताना आम्हाला सर्वांना अकोले येथील सरकारी दवाखान्यात नेण्यात आले. अमोल गायकवाड याचे डोक्याला जास्त मार लागलेला होता. त्यांना संगमनेर येथे व तेथून त्यांना नोबेल हॉस्पीटल येथे पुण्याला नेण्यात आले. आम्हाला ज्या गाडीने धडक दिली होती तिचा नोंदणी क्रमांक एम.एच १२ सी.ए. ३४५९ असा होता. गाडीवरील चालकाचे नाव सचीन कुदळ असे होते. मी आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती. एस. बी. नवले यांच्या मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही तिघेजण गाडीवरून येत होतो

त्यामुळे पोलीसांनी आम्हाला थांबवले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी थांबवल्यामुळे आम्ही पुढे गेलो व घाबरलो व त्यामुळे खाली पडलो. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यावेळी गाडी कोण चालवत होते हे मी पाहिले नाही. साक्षीदार सांगतो की, गाडी सुगाव येथे पकडल्यानंतर पोलीसांनी त्यास पकडले. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली त्यावेळी पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे व आम्ही तिघेजण एकाच गाडीवर जात असल्यामुळे गाडी घसरून पडली. हे म्हणणे खरे नाही की, नुकसान भरपाई मिळावी म्हणून सदरची खोटी केस दाखल केली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

ANANT RADHAKISHAN TENGSE Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE Date: 2025.08.02 16:56:03 +0530

दिनांक ०२.०८.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले